RNI No. MAHBIL/2012/48433
www.dgps.maharashtra.gov.in.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग एक – पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १५, अंक - ८ ] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी १९ - २५, २०२६ / माघ ३० ते फाल्गुन ६, शके १९४७ [ पृष्ठे-१८५

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय/संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

**नगर विकास विभाग**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

दिनांक : १० फेब्रुवारी २०२६

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

**अधिसूचना**

क्रमांक टीपीएस-१८२३/१५४४/प्र.क्र.४२/२०२३/लवाद/नवि-१३.—ज्याअर्थी, नगर रचना परियोजना, फुरसुंगी क्र. १० या पुणे महानगरपालिकेने दिनांक २७ जून २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रारूप परियोजनेस, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यात यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ६८ चे उपकलम *(२)* चे तरतुदीन्वये प्राप्त अधिकारात, शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्रमांक टीपीएस-१८२३/१५४४/प्र.क्र.४२/२०२३/नवि-१३ दिनांक १९ जून २०२५ अन्वये मंजूर करण्यात आली आहे (यात यापुढे "उक्त नगर रचना परियोजना" असे संबोधिले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ७२ *(१)* अन्वये उक्त नगर रचना परियोजनेस मंजुरीबाबत प्रसिद्ध झालेल्या शासन राजपत्राच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत लवाद यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर नगर रचना परियोजना, फुरसुंगी क्र. १०, महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, जुलै १७-२३, २०२५ रोजी प्रसिद्ध झालेली आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस-१८२३/१५४४/प्र.क्र.४२/२०२३/लवाद/नवि-१३, दिनांक ११ ऑगस्ट २०२५ अन्वये, श्रीमती साधना नाईक, निवृत्त उपसंचालक, नगर रचना यांची उक्त नगर रचना योजनेसाठी लवाद म्हणून नियुक्ती केली होती ;

आणि ज्याअर्थी, श्रीमती साधना नाईक, निवृत्त उपसंचालक, नगर रचना यांनी, उक्त नगर रचना परियोजना योजनेकरिता लवाद म्हणून कामकाज करण्यास असमर्थता दर्शवलेली असून उक्त नगर रचना परियोजना योजनेचे लवादीय कामकाज शीघ्रतेने व विहित मुदतीत पार पाडण्याकरिता इतर अधिकाऱ्यांची लवाद म्हणून नियुक्त करणे आवश्यक झाले आहे.

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ७२ *(१)* अन्वये आणि महाराष्ट्र नगर रचना योजना नियम, १९७४ मधील नियम क्र. ११ नुसार प्रदत्त अधिकारांचा वापर करून श्रीमती साधना नाईक, निवृत्त उपसंचालक, नगर रचना यांच्याऐवजी श्री. दत्तात्रय निवृती पवार, सेवानिवृत्त उपसंचालक, नगर रचना यांची उक्त मंजूर नगर रचना परियोजनेसाठी तत्काळ प्रभावाने लवाद म्हणून नियुक्ती करीत आहे व लवाद यांना त्यांच्या कर्तव्यांचे

पालन विहित कालमर्यादेत करण्यासाठी आवश्यक ती सर्व वाजवी मदत, तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे आणि त्यासाठी येणारा खर्च वहन करण्याचे निर्देश मुख्याधिकारी, फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद यांना देण्यात येत आहेत.

**टीप:-**

(१) प्रस्तुतची अधिसूचना, फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद व आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

(२) सदर अधिसूचना नगर विकास विभागाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध राहील.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,*

**प्रणव कर्पे,**

उपसचिव,

महाराष्ट्र शासन.

---

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

**Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,**
**Mantralaya, Mumbai-400 032.**

Dated : 10th February 2026

*The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*

## NOTIFICATION

No. TPS-1823/1544/CR-42/2023/Arbitrator/UD-13.—Whereas, the Draft Town Planning Scheme, Fursungi No. 10, submitted by the Pune Municipal Corporation by letter dated 27th June 2023 has been sanctioned by the Government *vide* Notification No. TPS-1823/1544/CR-42/2023/UD-13, dated 19th June 2025 (hereinafter referred to as “the said Town Planning Scheme”) issued under sub-section *(2)* of Section 68 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred as “the said Act”) ;

and whereas, as per the provisions of Section 72 *(1)* of the said Act, it is necessary to appoint an Arbitrator, within one month from the date on which the sanctioned Town Planning Scheme is published in the Official Gazette ;

and whereas, the said Town Planning Scheme Fursungi No. 10 has been published in the Official Gazette, Part One-Pune Divisional Supplement, July 17-23, 2025 ;

and whereas, the Government of Maharashtra has appointed Smt. Sadhana Naik, Retired Deputy Director of Town Planning as an Arbitrator for the said Scheme *vide* it’s Notification No. TPS-1823/1544/C.R.42/2023/Arbitrator/UD-13, dated 11th August 2025 ;

and whereas, Smt. Sadhana Naik, Retired Deputy Director of Town Planning, has expressed their inability to work as an Arbitrator for the said Town Planning Scheme and since the work related to the said Town Planning Scheme needs to be carried out expeditiously and within the stipulated time, it has become necessary to appoint other officer as an Arbitrator for the said Town Planning Scheme ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of Section 72 of the said Act, read with Rule No. 11 of the Maharashtra Town Planning Scheme Rules 1974, the Government of Maharashtra hereby, in place of Smt. Sadhana Naik, appoints Shri. Dattatray Nivrutti Pawar, Retired Deputy Director of Town Planning as an Arbitrator for the said sanctioned Town Planning Scheme with immediate effect and The Chief Officer of the Fursungi-Uruli Devachi Municipal Council is hereby directed to extend all reasonable assistance to the Arbitrator and also provide other necessary perks to carry out duties cast upon him in the time bound manner and bear the cost on such items ;

## जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांजकडून

### ज्ञापन

क्रमांक जि.उ.नि.ग्रा./पणन/कृ.उ.बा.स.,पुणे/उपविधी दुरुस्ती/९१३४/२०२५.—ज्याअर्थी, कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे या बाजार समितीने मुख्य बाजार आवाराचे नावामध्ये श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड ऐवजी श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड अशा दुरुस्तीसंदर्भात दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजीच्या संचालक मंडळ सभेमधील ठराव क्रमांक ५ नुसार उपविधी क्रमांक १ व २ *(६)* दुरुस्ती प्रस्तावबाबत मी, प्रकाश ल. जगताप, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (ग्रामीण), महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ६१ *(१)* व नियम १९६७ चे नियम १२१ मधील तरतुदीनुसार उपविधी दुरुस्तीबाबत खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

| **तपशील** | **आदेश** |
|---|---|
| कृषी उत्पन्न बाजार समिती,<br>मुख्य कार्यालयाचा नोंदणीकृत पत्ता | सोबत जोडलेल्या पुरवणी क्रमांक ४ प्रमाणे मंजूर |

### पुरवणी क्रमांक ४

### कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे

### उपविधी क्रमांक १

### बाजार समितीचे नाव

| उपविधी क्रमांक | बाजार समितीचे नाव |
|---|---|
| १. | महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील तरतुदीनुसार बाजार समितीचे नाव :- कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे असे आहे व बाजार समिती कार्यालयाचा नोंदणीकृत पत्ता :- श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे-३७ असा आहे. |

### पुरवणी क्रमांक ४

### कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे

### उपविधी क्रमांक २ *(६)*

### व्याख्या :- मुख्य बाजार

| उपविधी क्र. २ *(६)* | मुख्य बाजार |
|---|---|
| | मुख्य बाजार या संज्ञेचा अर्थ अधिनियमाच्या कलम ५ मधील तरतुदीनुसार जाहीर केल्याप्रमाणे आहे.<br>**मुख्य बाजार आवाराचे नाव :-** श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे-३७ असे असून, मुख्य बाजार आवाराचे क्षेत्रफळ ७२ हे. ६० आर इतके आहे.<br>**मुख्य बाजार आवाराचा पत्ता :-** श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे-३७ असा आहे व त्याप्रमाणे खालील बाजार आहेत.<br>(१) फळे-भाजीपाला बाजार, (२) गूळ भुसार बाजार, (३) फुलांचा बाजार, (४) पान बाजार, (५) गुरांचा बाजार, (६) केळी बाजार. |

**टीप :--** या कार्यालयाचे जावक क्रमांक ९१३४/२०२५, दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजीचे ज्ञापनान्वये सदर उपविधी मंजूर करण्यात आला आहे.

**प्रकाश ल. जगताप,**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे (ग्रामीण).

पुणे, ९ फेब्रुवारी २०२६.